पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणी मध्ये सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२५/प्र.क्र.१०५/योजना-१०**
बांधकाम भवन २५, मर्झबान रोड,फोर्ट, मुंबई-४००००१.
दिनांक: १४ ऑगस्ट,२०२५

**वाचा:**

१) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/योजना-१०, दिनांक ३० डिसेंबर, २०१५.
२) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३३३/योजना-१०, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६.
३) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१०, दिनांक १४ जुलै, २०१७.
४) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीडीयु-२०१८/प्र.क्र.२५७/योजना-१०, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१८.
५) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्रआयो-२०२१/प्र.क्र.९७/योजना-१०, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१.
६) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्रआयो-२०२१/प्र.क्र.८१/योजना-१०, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२.
७) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्रआयो-२०२३/प्र.क्र.१३४/योजना-१०, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४.

**प्रस्तावना:-**

केंद्र पुरस्कृत, इंदिरा आवास योजनेच्या नावात बदल करुन “प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण” असे करण्याचा निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. या योजनेतील घरकुल मंजूर असलेल्या लाभार्थींना घरकुलासाठी जागा उपलब्ध नाही, अशा लाभार्थ्यांना “पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत” जागा खरेदी करण्यासाठी रु. ५०,०००/- अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक १४ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये तालूका समिती गठीत करण्याची कार्यपद्धती, समितीची कार्यकक्षा व जागा खरेदीची प्रक्रिया नमुद करण्यात आलेली आहे. दिनांक ०२ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, शासकीय जमिनी मुल्य विरहीत उपलब्ध करुन देणे, तसेच लाभार्थ्यांने शासकीय

जागेवर अतिक्रमण केलेले असल्यास, सदरची, जागा विनामुल्य नियमानुकूल करणे, अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत. दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये बहुमजली गृहसंकुले (हाऊसिंग अपार्टमेंट) उभारणेचा समावेश करण्यात आला आहे. दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व ग्रामीण गृह निर्माण योजनांमध्ये भुमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदी करतांना मुद्रांक शुल्क रु. १,०००/- आकारणे, मोजणी शुल्कामध्ये ५०% सवलत लागू करण्यात आली असून, तीन मजली (G+३) व चार मजली (G+४) इमारत बांधकामास मान्यता देण्यात आली आहे. दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घरकुल जागा खरेदी करण्याच्या अनुदानामध्ये ५०० चौ.फुटास रुपये १,००,०००/- पर्यंत वाढ करण्यात आली आहे. परंतू यामध्ये प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रुपये १,००,०००/- या पैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देय आहे,अशी सुधारणा करण्याची बाब विचाराधिन आहे.

२. मा. मंत्री (ग्रामविकास व पंचायतराज) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या विभागीय आढावा बैठकांमध्ये पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने काही बाबींबाबत क्षेत्रीय यंत्रणेस सुचना/निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत अन्य ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागेअभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित राहू नयेत म्हणुन सुरू करण्यात आलेल्या “पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेच्या” प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय यंत्रणेस खालीलप्रमाणे सुचना/निर्देश देण्यात येत आहेत.

(अ) या योजनेअंतर्गत भुमिहीन लाभार्थ्यांना ५०० चौ.फुट जागा खरेदीसाठी रु.१,००,०००/-(रुपये एक लक्ष)च्या मर्यादेत अर्थसहाय्य अनुज्ञेय असून, लाभार्थ्याने जागेची निवड केल्यानंतर जागा हस्तांतरण योग्य व जागेची किंमत त्याची शहानिशा तालुकास्तरीय समितीने करणे, यासाठी बाजार मुल्य याचा विचार करुन संबंधीत किंवा आजुबाजुच्या गावामध्ये नजिकच्या काळात झालेले खरेदी-विक्री व्यवहार, बिनशेतीचे दर, गावठाणातील जमिनीचे दर, मुख्य रस्त्यावरील जागेचे दर, जागा विक्री करणारा व लाभार्थी यांच्या मधील सौदा चिठ्ठी तसेच स्थानिक चौकशी इत्यादी बाबींचा विचार करुन जागा दराबाबत निर्णय घेण्यात यावा.

(ब) या योजनेअंतर्गत जागा खरेदी प्रक्रियेअंतर्गत लाभार्थ्याने जागा मालकाबरोबर केलेल्या विक्री करारानंतर (Agreement of sale) देय अर्थसहाय्य रक्कम लाभार्थ्यास अदा करण्यात यावी व लाभार्थ्याने सदर अनुज्ञेय रक्कम जागा विक्रेत्याला अदा करुन सदर जागेची प्रत्यक्ष खरेदी ( Sale Deed) करण्याची प्रक्रिया पुर्ण करण्याचे तालुकास्तरीय समितीने सुनिश्चीत करावे.

(क) जागेची कमी उपलब्धता व जास्त किंमत याचा विचार करुन या योजनेअंतर्गत एकापेक्षा जास्त लाभार्थी एकत्र येऊन G+१, G+२, G+३, G+४ पर्यंत बहुमजली इमारतीसाठी एकूण लाभार्थ्यांच्या एकत्रीत अर्थसहाय्यातून जागा खरेदी करु शकतात. परंतू प्रती लाभार्थी प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रुपये १,००,०००/- या पैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देय राहील.

(ड) जागेची कमी उपलब्धता व जास्त किंमत याचा विचार करुन या योजनेअंतर्गत अनेक लाभार्थी एकत्र येऊन गृहसंकुले (Housing Colony) किंवा बहुमजली गृहसंकुले (Housing Apartment) साठी एकूण लाभार्थ्यांच्या एकत्रीत अर्थसहाय्यातून जागा खरेदी करु शकतात. परंतू प्रती लाभार्थी प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रुपये १,००,०००/- या पैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देय राहील.

(इ) या योजनेंतर्गत भुमिहीन लाभार्थ्यांना ५०० चौ.फुट जागा खरेदीसाठी रुपये १,००,०००/-(रुपये एक लक्ष मात्र)च्या मर्यादेत अर्थसहाय्य अनुज्ञेय असून, किमान २० पेक्षा जास्त लाभार्थ्यांनी एकत्र येऊन उभारलेल्या हाऊसिंग कॉलनी करीता मुलभूत नागरी सुविधा जसे- जोड रस्ता, अंतर्गत रस्ता, ड्रेनेज व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, इ. साठी जागा खरेदी करण्याकरीता अतिरिक्त २० % जागेसाठी अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. हा खर्च पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल. अतिरिक्त २०% अर्थसहाय्यातुन खरेदी करण्यात आलेले क्षेत्र हे सामुहिक राहिल, हे क्षेत्र लाभार्थी किंवा ग्रामपंचायत मार्फत खरेदी करता येईल तथापि त्याची मालकी अंतिमत: ग्रामपंचायतीकडे राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८१४१५०४५२०३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VARSHA M BHAROSE

Digitally signed by VARSHA M BHAROSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2F3096A175796CC670522C4AFF97DA20B708981B5122E87C8346C4CC7468F821, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1BD844032884BBF2167BC99CD85325223ACEEF69D02BD455B7CA6972491623E0, cn=VARSHA M BHAROSE
Date: 2025.08.14 16:12:00 +05'30'

**(व.मुं.भरोसे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव व प्रधान सचिव.

३. मा.मंत्री(ग्रामविकास व पंचायतराज) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५.मा. राज्यमंत्री(ग्रामविकास व पंचायतराज) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व मा. विधानसभा व विधानपरिषद सदस्य
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई-१
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१२. महालेखापाल (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व).
१४. विभागीय आयुक्त (सर्व).
१५. जिल्हाधिकारी (सर्व).
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य जीवनन्योती अभियान, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१८. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१९. संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२३. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
२४. ग्राम विकास व पंचायत राज विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२५. उप सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६. उप सचिव, नियोजन (का. १४११ व १४१४) व वित्त विभाग (का. व्यय-१५ व अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
२७. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व).
२८. अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
२९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व).
३०. निवड नस्ती (कार्यासन योजना-१०)